
ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

VOL. 4 NO. 6 SPECIAL ISSUE DECEMBER 2018 IMPACT FACTOR:4.197(IIJIF)



*Special Issue On*

## PROBLEMS AND CHALLENGES BEFORE THE WORKING WOMEN

*Guest Editor*

**Dr. Vasant Satpute**

*Associate Editor*

**Dr. Sunita Tengse**

*Assistant Editor*

**Dr. M. B. Patil**

**Full Journal Title:** *Chronicle of Humanities & Cultural Studies*
**Print ISSN:** 2454-5503
**Impact Factor:** 4.197 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / Journal
**Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanshruti Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS). Email: chcskalyan@gmail.com

*Guest Editor*
**Dr. Vasant Satpute**, Principal, L. B. W. College, Sonpeth, Dist. Parbhani

*Associate Editor*
**Dr. Sunita Tengse**, HoD, Sociology, L. B. W. College, Sonpeth, Dist. Parbhani

*Assistant Editor*
**Dr. M. B. Patil**, HoD, Botany, L. B. W. College, Sonpeth, Dist. Parbhani

*Chief Editor :*
**Dr Kalyan Gangarde**, Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade**, Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal**, Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Dr Pandurang Barkale**, Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane**, Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dr Dashrath Kamble**, Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Dr Sachin Bhumbe**, Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

Aju Mukhopadhyay,
Dr R.T. Bedre,
Dr (Mrs.) Smita R. Nagori,
Dr Arvind Nawale
Dr Rajiv Kumar,
Dr Kailash Nimbalkar,
Tsai-ching Yeh
Dr B. N. Gaikwad,
Dr Simon Philip,
Dr Binu Anitha Josheph
Dr Ramkishan Bhise

**Subscription Rates**

| | |
|---|---|
| Annual Membership (Individual) | ₹ 1,800 |
| Bi-annual Membership | ₹ 3,500 |
| Institutional Annual Membership | ₹ 2,200 |
| Institutional Bi-annual Membership | ₹ 4,200 |
| Annual Membership for Foreigners) | $150 |

*Printed by* Kalyan Gangarde
New Man Publication, Parbhani
Email: nmpublication@gmail.com Mob. + 91 9730721393 8329000732

**DISCLAIMER:** Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

11

# स्त्री स्वातंत्र आणि समाज

**डॉ. बालासाहेब मुंजाभाऊ काळे**
सहयोगी प्राध्यापक,
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी ४३१५१६

स्त्री जातीवरील अन्याय हा मानवजातीच्या इतिहासा इतकाच ~~समानत~~ सनातन आहे. सेक्स, समाज आणि संस्कृती यांच्या पिढ्या न् पिढ्यांच्या धाकाने, आपल्या सोयी स्वार्थासाठी पुरुषांनी स्त्रियांना आपल्या इतके दडपणाखाली ठेवले की दडपणाखालचे आयुष्य हेच स्त्रीचे नैसर्गिक आयुष्य असे स्त्रियांनाही वाटु लागले. बदलते समाजजीवन, विज्ञानाचा दय व शिक्षणाने मिळालेला आत्मविश्वास, यामुळे आपला दुर्बल व पराधीन आयुष्याची जाणीव होत होत गेल्या चार - पाच दशकात स्त्रिया आपला आवाज उंचावु लागल्या आहेत. स्त्रियांच्या स्वातंत्र्य आणि समानतेचे लढे छोट्या स्वरुपात गेल्या शतकाच सुरु झाले तरी अजुनही संघटीतपणे स्त्रीवादी चळवळींनी विश्वव्यापी जोर धरला आहे असे खणखणीतपणे म्हणता येणार नाही.

समाजाच्या इतिहासातील स्त्रीचं स्थान पाहिल तर जगाच्या तुलनेत आमेरिकन स्त्री ही कित्येक बाबतीत अधिक नशीबवान होती असे म्हणावे लागेल, तरीसुध्दा मानव म्हणुन अपले हक्क मिळविण्यासाठी मिळकतीवरचा हक्क, मतांचा हक्क मिळविण्यासाठी आमेरीकन स्त्रियांनाच जास्तीत जास्त लढा द्यावा लागला हे वास्तव आहे. १८६३ च्या अधीपासूनच आमेरिकन स्त्रीने स्वतःची ओळख पटवुन घ्यायला सुरुवात केली होती. या काळात उच्चशिक्षण घेण्याचा हक्क, करिअर करण्याचा हक्क, मतांचा हक्क यांची मागणी करणाऱ्या स्त्रियांची निर्भत्सना त्या काळात केली गेली स्त्रीचे स्वातंत्र्य, माणुस म्हणुन असलेले अधिकार यासाठी लढा देताना अनेक आमेरिकन स्त्री कार्यकर्त्यांनी तुरंगवास व हौताम्य पत्करलेले आहे. ही चळवळ पुरुष व्देषातुन, कडवट प्रतिक्रियेतुन, लैगिंक सुख न मिळालेल्या असंतुष्ट बायकांकडुन किंवा लिंग अभावातुन आलेल्या वैफल्यातुन आणि स्त्रीमध्ये असलेली प्रेम करण्याची शक्ती नसलेल्या बायकांकडुन उदयाला आली आहे असे या चळवळी बद्यल आमेरिकेत बोलले जात होते.

स्त्रियांच्या परंपरागत भुमिकेला चिकटुन राहणाऱ्या सनातन्याबरोबर जुन्या पोथ्यापुराणातुन स्त्रियांच्या दुय्यमपणाचे दाखले देणाऱ्या पोथीनिष्ठ धर्मगुरुविरुध्दही स्त्रियांना लढावे लागेल. 'द हेड ऑफ एव्हरी वुमन इज मॅन' किंवा 'अॅडम वॉज फर्स्ट बॉर्न देन इव्ह' अशासारख्या बायका अनैसर्गिक राक्षसिणी असुन परमेश्वराने स्त्रीला दिलेला सेवावृत्तीची देनगी नष्ट करुन त्या घरादाराची राखरांगोळी करत आहेत व

Bonpeth
Pin-431516

पुरुषांप्रमाणेच स्त्रिया समान, महान आहेत अशा प्रकारचा प्रचार [illegible] केला. [illegible] अशी आहे की नवऱ्याच्या दबावाखाली अपमानाच्या व स्वातंत्र्य या कल्पनेलाच घाबरुन, या [illegible] सूत्रात [illegible] रडू, इच्छीणाऱ्या सामान्य स्त्रियांचाच विरोध या चळवळीला झाला. त्यांनी वाटायचे की लवकर लग्न व्हावे, चार तरी मुले असावीत, शहराच्या चांगल्या भागात सर्वसंपन्न घर असावे. आरोग्यसंपन्न कुटुंब, सुंदर व श्रीमंत नवरा, गुटगुटीत मुले, गाडी सुसज्ज घर यापलीकडे स्त्रीची मागणी नव्हती. पत्नी व आई या पदाला समाजात मान होता. गाड्या, कपडे, घरगुती उपकरणे यांची खरेदी, बाजारहाट यातच सामान्य स्त्रिया समाधानी होत्या.घर सुंदर सजवायचे, ऑफीसला जाताना नवऱ्याला बाय बाय करायचा, पोरे स्वत: ड्रायव्हिंग करत शाळेत पोचवायची, अत्याधिक कायम स्वच्छता ठेवायची, पाव घरी बनवायचे मुलांचे कपडे घरी शिवायचे, रोज पडदे बदलायचे आणि करिअरच्या मागे असणाऱ्या मागच्या पिढीतील आपल्या आयांची कीव करायची हे सामान्य आमेरीकन स्त्रीचे त्याकाळात महत्वाचे वैशिष्ट्य होते.

आमेरीकेत स्त्री ही पुरुषापेक्षा वरच्या की खालच्या दर्जाची अशी चर्चा होत नसे तर स्त्री ही पुरुषापेक्षा वेगळी आहे हे त्या काळी समाजाने गृहीतच धरले होते सिमॉन द बोव्हाचे ' द सेंकड सेक्स' हे पुस्तक प्रसिध्द झाल्यावर एका आमेरीकन समीक्षकाने 'या बाईला जीवन म्हणजे काय हे जरासुध्दा माहित नाही आणि हे सगळे फ्रेंच बायकाबद्दल आहे. आमेरीकेत असे प्रश्न अस्तित्वातच नाहीत ' असे उद्गार काढले होते.

आमेरिकन स्त्रीवादी चळवळीतील स्त्रियांनी आमेरीकन स्त्रीच्या स्वातंत्र्याचा लढा उभारला १६७४ मध्ये मार्गारेट ब्रेटनने प्रथम मेरीलँड विधानसभेत स्त्रियांना स्थान व मताचा हक्क मिळवण्याची मागणी केली आणि ती अर्थातच फेटाळण्यात आली. १६९१ त १९८० या काळात संपतीची मालकी असणाऱ्या स्त्रियांना मॅसाच्युसेटमध्ये मताधिकार मिळाले १८३० ते १८४० च्या दरम्यान स्त्रियांना पुर्ण मताधिकार मिळवण्यासाठी अनेक प्रयत्न झाले पॉलीना राईट डेव्हीस, ल्युक्रेशिया मॉट, ल्युसी स्टोन, ईर्नेन्टाइन, इलिझाबेथ, कॅडी स्टॅन्टन, मार्था राईट, मेरी ॲन मॅकलिन्टॉक इत्यादी स्त्रीयांनी लढा उभारुन आमेरीकन स्त्रीला १९१८ मध्येच पुरुषांच्या बरोबरीचे सर्व अधिकार मिळवुन दिले.

या पार्श्वभूमीवर जेंव्हा आपण भारतीय स्त्रीयांचा विचार करतो तेंव्हा भारतीय स्त्रीयांना त्यांच्या अधिकाराची जाणीव होण्यास खुप कालावधी लागला. प्राचीन काळात धर्माच्या आडून स्त्रियांवर अनेक बंधने पुरुषप्रधान संस्कृतीत लादण्यात आले होते. 'चुल आणि मुल' हचे तिचे कार्यक्षेत्र होते. इतिहास व पुराणातुन स्त्रियां पुरुषापेक्षा वेगळ्या काढलेल्या दिसतात. स्त्री ही एक न उकलणारे गुढ आहे अशा प्रकारचे वलय तिच्याभोवती तयार केले जाते. कारण ती एकाच वेळी सबला व

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

अबली, कामुक व विरपत्त, शरणागत व अंकुशधारिणी अशी दाखविले जाते, स्त्रिच्या चित्रणात धरित्रिच्या रुपाने मातेस्वरुप प्रतिमा, निसर्गाच्या रुपाने सर्जनशील प्रतिमा, देवीच्या रुपाने दुष्टांचा संहार करणाऱ्या शक्तीची प्रतिमा जशी येते तशी ती एक बाजुला चेटकीण, मांत्रिक, हडळ, पुरुषांना मोहात पाडुन त्यांच्या स्थलनाला कारणीभुत होणाऱ्या विकारशील प्रकृतीची तर दुसऱ्याबाजुला एकनिष्ठ, प्रतिवृता व कामरुप आयुष्यात तारुन नेणाऱ्या आशा पत्नीची प्रतिमा येते.

सती सवित्री, सीता, द्रौपदी, कुंती , रंभा, मेनका, कहाणी वाङ्मयातल्या स्त्रिया, कालिदासाच्या रतीप्रधान सौदर्यवती नायिका, लढवय्या देवीच्या कथा इत्यादी सर्व चित्रणात भारतीय स्त्रीच्या म्हणुन परस्पराशी वेगळ्या असलेल्या प्रतिमा दिसतात. सद्गुणी सदाचारी, प्रामाणिक, एकनिष्ठा पतिव्रता, उत्तम पत्नी प्रेमळ आहे, गृहिणी, धर्म सांभाळणारी, नीतीमान हे स्त्रीचे परंपरेने समजले जाणाऱ्या गुणांची आपेक्षा भारतीय समाजाने तिच्याकडुन ठेवली आहे. आजही त्याच्यात फारसा बदल झाला नाही असे दुर्वेवाने म्हणावे लागते. स्त्रीची प्रतिमा ही परंपरेने निर्माण केलेल्या पुरुष प्रतिमेपेक्षा नेहमीच भिन्न व दुय्यम मानली आहे. स्त्री ही देवी असो रंभा असो वा चेटकीण, तिच्या भोवती एक गुंढ  वलय आहे. साऱ्या जागावर विधान करता येईल. स्त्रीस्वभावाबदल मात्र काही बोलता येण कठीण आहे असे धर्मशास्त्र सांगते लैगिंक बाबतीतले पुरुषाचे दुटप्पी वर्तन, लैंगीक हिंसाचाराचे समर्थन बलात्कार  व वेश्या व्यवसायाचे समर्थन, बाईला मारण्याचे समर्थन, बायकीपणा व पुरुषीपणा याबाबतच्या सांकेतिक कल्पना या  संगळयां मागे जुन्या पौराणिक प्रतिमांचाच पगडा आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर शिक्षण हे खेडोपाडी पोहचले त्यामुळे स्त्रियां शिकु लागल्या शिक्षणामुळे त्यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव झाली. सामाजिक कार्यातील क्रियाशील सहभाग व शिक्षण या स्त्रियांच्या प्राथमिक गरजा आहेत याची जाणीव स्त्रियांना १९६० नंतरच्या काळात होऊ लागली. पुरुषाच्या बरोबरीच सर्व अधिकार कायद्याने मिळाले एका अर्थाने स्त्री आज 'मुक्त' आहे ती मते देऊ शकते. संस्था काढु शकते. इच्छित व्यवसाय निवडु शकते, याचा अर्थ या गोष्टी करण्यास आज कायद्याने आठकाठी नाही पण नोकरीच्या ठिकाणी केले जाणारे भेदभाव बरोबरच्या पुरुष सहकाऱ्यांची वर्तणुक - कुटूंबातला समाजवाद, न संपणाऱ्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, परंपरेने निर्माण केलेली लैगिंक प्रतिमा हे सर्व कायद्याच्या अडथळा पलीकडचे आहे.

आज लहान मुले संभाळण्यासाठी पाळणाघरांची सोय आहे. नकोसे मुल टाकण्यासाठी गर्भनिरोधकाची सोय आहे, घरकामाच्या जाचातुन सुटण्यासाठीची  सोय आहे, पण अजुनही समाजाची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टी बदलंत नाही. नाटक, सिनेमे, जाहीराती यातुन या तर तिचे  गौण स्थान दिसतेच पण शरीर प्रदर्शनाच्या वृत्तीतुन एक

उपभोग्य वस्तु एवढीच तिची किंमत केली जाते. एखाद्या टक्का स्त्रिया सत्तास्थानावर असतीलही, पण सर्वसाधारपणे कारकुन, शिक्षक, पारिचारिका, स्वागतिका अशा दुय्यम स्थानांवर अधिक स्त्रिया आढळतात. आर्थिक स्वातंत्र्य मिळाले याचा अर्थ फक्त स्त्री कमवु लागली एवढाच, ती कमाई स्वतःच्या इच्छेप्रमाणे गोष्ट म्हणजे पुरुषी अंहकार किंवा अस्मिता यांची जबरदस्त पकड आजही स्त्रियांवर आहे सेक्स ही दोघांनी मिळुन उपभोगण्याची गोष्ट न राहता आजही पुरुषाने स्त्रीवर मिळविलेला विजय आणि स्त्रीची पुरुषापुढे शारीरिक शरणागती हाय परंपरागत भाव स्त्री पुरुषांच्या मनात घट्ट रोवुन बसलेली आहे.

आज स्त्रियांनी स्वतःच्या 'गृहिणी' या भुमिकेला ठाम नकार देणे. याचा अर्थ घर, संसार ,नवरा, मुले - बाळे सोडणे असा नव्हे घर, लग्न, आईपण यांच्याच बरोबरीने करिअर ही तितकीच महत्वाचे व ती या गोष्टीबरोबर करता येते हे समजून घेणे महत्वाचे स्वतःला दिशा दाखविणारे दुसरे स्वयांशिक्षण म्हणजे विवाहसंबंधातील वास्तवता समजुन घेणे वैवाहीक संबंधाना फाजील महत्व व त्यातील शरणागतीची भुमिका सोडुन देणे गरजेचे आहे. स्त्री जेंव्हा आपल्या क्षमतेला न्याय देणारी नोकरी शोधते, त्यासाठी हवे असलेले उच्च शिक्षण वा ट्रेनिंग घेते आणि जीवनभराच्या गंभीरपुर्वक विचार- योजनेतुन ते काम करते त्यावेळीच फक्त समाजाची एक घटक व्यक्ती म्हणुन ती महत्वाची ठरते. स्वागतिका, विक्रेती, व्याक्तिगत चिटणीस असा प्रकारच्या हलक्याफुलक्या नोकऱ्या स्त्रिया आपल्या क्षमतेची जाणीव न करुन घेता स्वीकरतांना दिसतात. घर, मुले, नवरा यांना आपण पुर्ण न्याय देऊ शकत नाही आशा अपराधीपणाच्या भावनेने स्त्रियांची नोकरीत पुर्णपणे बांधीलकी राहण्यात अडथळे निर्माण होतात,पण स्त्रीला हे अडथळे ठामपणे पार करता आले पाहिजे.

त्याचबरोबर स्त्रीला स्वतःच्या सामर्थ्याबदल विश्वास हवा स्वतःला मिळणाऱ्या दुय्यम स्थानाचा निषेध करण्याची मानसिक तयारी हवी. घर ते बाहेरचे जग या मोठ्या उडीत स्वतःचे सामर्थ्य व क्षमता नाकारणाऱ्या कोणत्याही घटकाशी दोन हात करण्याची तयारी हवी वेतन, संधी वागणुक इत्यादी बाबतीत जिथे स्त्रियांवर अन्याय होतो तिथे स्त्रीनेच आवाज उठवायला हवा पुरुषांशी माणुस म्हणुन निकोप व स्पर्धा हवी, स्त्री म्हणुन नको राजकारणातही गृहीणी म्हणुन नव्हे तर नागरीक म्हणुन तिला स्थान मिळायला हवे.

**संदर्भ ग्रंथ :**


- समकालीन मराठी कविता : प्रकाश देशपांडे
- स्त्रीवादी समीक्षा : स्वरुप आणि उपयोजन - डॉ. अश्विनी धोंडगे
- मराठी लेखिका चिंता व चिंतन - डॉ. भालचंद्र फडके


□□□


PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani